मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# स्वच्छतेचा जागर करत आयुक्त 'ऑन फील्ड'!

## मोहिमेत तब्बल 350 हून अधिक नागरिकांनी स्वच्छतेची शपथ घेत उत्साहाने सहभाग नोंदविला



**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या "स्वच्छता ही सेवा" अभियानांतर्गत पिंपरीत आज भव्य स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. पिंपरी मंडई परिसरात झालेल्या या मोहिमेत महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह सहभागी झाले होते.

या मोहिमेत तब्बल ३५० हून अधिक नागरिकांनी स्वच्छतेची शपथ घेत उत्साहाने सहभाग नोंदविला. नागरिकांशी संवाद साधताना आयुक्त शेखर सिंह यांनी "स्वच्छ सर्वेक्षण २०२४-२५ मध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने देशात सातवे तर महाराष्ट्रात पहिले स्थान मिळवले आहे. आगामी सर्वेक्षणात देशात अव्वल क्रमांक पटकावण्यासाठी आपण सर्वांनी मिळून सामूहिक प्रयत्न करणे आवश्यक आहे, यासाठी महानगरपालिका पूर्णपणे कटिबद्ध आहे."असे सांगितले.

स्वच्छतेच्या मोहिमेदरम्यान आयुक्त शेखर सिंह यांनी सफाई सेवक महिला, व्यापारी आणि नागरिकांशी देखील संवाद साधला. सफाई सेवकांमुळे पिंपरी चिंचवड शहर स्वच्छ राहत असून,सफाई सेवकांचे योगदान बहुमोल आहे.

यावेळी बोलताना आरोग्य विभाग प्रमुख उप आयुक्त सचिन पवार म्हणाले शहर स्वच्छतेची आपली सामूहिक जबाबदारी असून, स्वच्छता सेवकांच्या मेहनतीला समाजाने योग्य आदर दिला पाहिजे,नागरिकांनीही स्वच्छतेच्या मोहिमेत सक्रिय सहभाग घेतला पाहिजे असेही ते म्हणाले.

कार्यक्रमाला पिंपरी चिंचवड महानगरपालिका आरोग्य विभाग प्रमुख, उप आयुक्त सचिन पवार, अ क्षेत्रीय अधिकारी निवेदिता घार्गे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, सहाय्यक आरोग्य अधिकारी राजू साबळे, कुंडलिक दरवडे, मुख्य आरोग्य निरीक्षक दत्तात्रय गणगे, आरोग्य निरीक्षक विकास शिंदे उपस्थित होते.

या मोहीमेची सुरुवात शगुन चौकातून झाली. त्यानंतर डिलक्स चौक, पिंपरी कॅम्प, रेल्वे स्टेशन आणि साई चौक या भागात स्वच्छता उपक्रम पार पडला. प्रत्येक ठिकाणी नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोहिमेला चालना दिली. यावेळी प्लॅस्टिक पिशव्यांचा वापर न करण्याबाबत जनजागृती करण्यात आली तसेच आरोग्य विभाग आणि ओंजळ संस्थेच्या सहकार्याने व्यापाऱ्यांना पर्यावरणपूरक कापडी पिशव्यांचे वाटपही करण्यात आले.

# निलेश नेवाळे यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रोजगार मेळावा व मोफत आरोग्य शिबिर

## वाढदिवसानिमित्त (दि.28) भव्य रोजगार मेळावा आणि (दि.29) मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन

**पिंपरी | प्रतिनीधी**

नेवाळे वस्ती, पूर्णा नगर प्रभाग क्रमांक ११ मधील संवेदनशील नेतृत्व, संयमी आणि अभ्यासू नेतृत्व निलेश मधुकर नेवाळे यांच्या वाढदिवसानिमित्त (दि.२८) भव्य रोजगार मेळावा आणि (दि.२९) मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

नेवाळे वस्ती, पूर्णा नगर (प्रभाग क्रमांक ११) मधील भाजपाचे अभ्यासू नेतृत्व निलेश नेवाळे यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा होत आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त रविवार दि.२८ सप्टेंबर रोजी सकाळी ९ ते दुपारी ३ या कालावधीत ग्रामीण आणि शहरी भागातील तरुणांसाठी भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यात २००० हुन अधिक विविध क्षेत्रातील नोकरीच्या संधी उपलब्ध होणार आहेत. या मेळाव्याचे आयोजन चेरीज चौक, आरंभ हॉटेल शेजारी, स्पाईन रोड, पूर्णानगर येथे करण्यात आले आहे.

तसेच (प्रभाग क्रमांक ११) नेवाळे वस्ती, हरगुडे वस्ती, कुदळवाडी भाग, कृष्णानगर, शरदनगर, कोयनानगर, महात्मा फुलेनगर, पुर्णानगर, घरकुल प्रकल्प, अजंठानगर, दुर्गानगर परिसरातील नागरिकांसाठी मोफत आरोग्य शिबिराचे देखील आयोजन करण्यात आले आहे. सोमवार दि.२९ सप्टेंबर रोजी सकाळी १० ते ४ या वेळेत हे शिबिर संपन्न होणार आहे. यामध्ये मोफत नेत्र तपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया, मोफत चष्मे वाटप, मोफत औषधे, शुगर तपासणी, रक्तदाब तपासणी, स्त्रीरोग तपासणी, अस्थिरोग तपासणी, त्वचारोग तपासणी यासह विविध तपासण्या अगदी मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहे.




निलेश नेवाळे यांच्या वाढदिवसानिमित्त चेरिज चौक, आरंभ हॉटेल शेजारी स्पाईन रोड, पूर्णानगर येथे सोमवार दि.२९ रोजी अभिष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन देखील करण्यात आले आहे. यावेळी प्रभाग क्रं.११ मधील सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन देखील निलेशदादा नेवाळे सोशल फाउंडेशनच्या वतीने करण्यात आले आहे.

# पिंपरी येथे होणार सेंट्रल फायर स्टेशन

## तब्बल 22 अग्निशमन बंब उभे राहतील; राजभरातील जवानांना मिळणार अद्यावत प्रशिक्षण

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने पिंपरी येथे मध्यवर्ती अग्निशमन मुख्यालय व प्रबोधिनी उभारण्याचे काम सुरू झाले आहे. तेथे तब्बल 22 अग्निशमन बंब उभे राहतील, इतके प्रशस्त पार्किंगसह जवानांसाठी (फायरमन) निवास व्यवस्था असणार आहे.

तसेच, येथे महापालिकेसह राज्यभरातील 100 अग्निशमन जवानांना प्रशिक्षण (ट्रेनिंग) देण्याची सुसज्ज व अत्याधुनिक यंत्रणा उपलब्ध करून देण्यात येत आहे. या माध्यमातून भविष्यात, शहरातून अनेक प्रशिक्षित जवान निर्माण होणार होतील.

अग्निशमन विभागाचे मध्यवर्ती मुख्यालय वायसीएम रुग्णालयाजवळील संत तुकारामनगर येथे आहे. तेथील जागा अपुरी पडत असल्याने गांधीनगर, पिंपरी येथे नव्या प्रशस्त ठिकाणी मुख्यालय बांधण्यात येत आहे.

महिंद्रा कंपनीकडून 'आयटूआर' अंतर्गत मिळालेल्या 5.5 एकर जागेत हे मुख्यालय बांधण्यात येत आहे. इमारतीचा खर्च 126 कोटी 24 लाख रुपये इतका आहे. त्या खर्चास 21 जानेवारी 2025ला स्थायी समितीची मान्यता मिळाली आहे. बी. जी. शिर्के कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी प्रा. लि.कडून काम सुरू झाले असून, सध्या खोदकाम सुरू आहे.



आठ मजली प्रबोधिनी इमारत असणार आहे. तेथे जवानांना अत्याधुनिक प्रशिक्षण देण्यात येणार आहे. एकूण 100 जवानांसाठी निवास व्यवस्था असणार आहे. दोनशे आसन क्षमतेचे प्रेक्षागृह व 50 आसन क्षमतेचे सेमिनार रूम असणार आहे. कवायत व प्रशिक्षणासाठी मैदान असणार आहे. कार्यालय व कार्यशाळा असणार आहे. संग्रहालयही असणार आहे.

अग्निशमन बंबांसह बोट वाहनतळ, ट्रेनिंग रूम, युद्ध कक्ष, ऑपरेशनल स्टाफ एरिया रूम, रेकॉर्ड रूम, मनोरंजन क्षेत्र, तयारी कक्ष, थिएटर आदी सुविधा असणार आहे. सोबत 118 अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या निवासाची व्यवस्था असेल. एकूण 22 अग्निशमन बंब उभे करता येतील, अशी प्रशस्त पार्किंग असणार आहे. इतर वाहनांची दोन मजली पार्किंग व्यवस्था असेल. अग्निशमन विभागातील कर्मचारी तसेच, प्रशिक्षणार्थी जवानांसाठी 15 मजली निवासी इमारत असणार आहे.

प्रबोधिनीत महापालिकेसह राज्यभरातील जवानांना अत्याधुनिक प्रशिक्षण दिले जाणार आहे. आपत्तकालीन परिस्थिती जसे आग, भूकंप, पूर, भूस्खलन, अपघात, दुर्घटना अशा आप्तकालीन परिस्थितीचे अत्याधुनिक प्रशिक्षण दिले जाणार आहे. त्यासाठी तज्ज्ञ आणि अनुभवी प्रशिक्षण व मार्गदर्शकही नेमले जाणार आहेत. या माध्यमातून भविष्यात पिंपरी-चिंचवडमधून असंख्य जवान तयार होतील. तसेच, महापालिकेच्या जवानांचीही कार्यक्षमता वाढणार आहे. त्यांना नवनवे तंत्रज्ञान व कौशल्य आत्मसात करता येईल, असा विश्वास महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

### वाढत्या शहरासाठी महापालिकेची सज्जता

» शहरात झपाट्याने वाढत असून, चारही बाजूने दाट लोकवस्ती निर्माण होत आहे. शहरातील अग्निसुरक्षा व आपत्कालीन सेवा अधिक मजबूत करण्यावर महापालिकेकडून भर दिला आहे. महापालिकेची अग्निशमन यंत्रणा सक्षम करणे. जवानांना सातत्याने प्रशिक्षण देणे. जलद प्रतिसादासाठी केंद्रीकृत सुविधा निर्माण करण्याच्या दृष्टिने महापालिका अत्याधुनिक अग्निशमन प्रशिक्षण अकादमी व निवासी संकुल प्रकल्प उभारत आहे, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

### जवानांच्या कार्यक्षमेत वाढ

» पिंपरी-चिंचवड महापालिका सार्वजनिक सुरक्षेला नेहमीच प्राधान्य देते. ही अग्निशमन प्रशिक्षण अकादमी केवळ आमच्या कार्यक्षमतेत वाढ करणारी नाही, तर अग्निसुरक्षा प्रशिक्षणाचे केंद्र म्हणूनही उपयुक्त ठरणार आहे. नागरिकांना अपघात कसे टाळावेत. जीव कसा वाचवावा याची माहिती मिळेल, असे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी सांगितले.

# हिंजवडीतील रस्त्यासाठी भूसंपादनाचा प्रस्ताव; वाहतूक कोंडी सुटण्याची आशा

## आयटी पार्कला जोडणारे 10 रस्ते प्रस्तावित; 20 किमी रस्त्यांची उभारणी पीएमआरडीएच्या माध्यमातून

**पिंपरी | प्रतिनिधी**

हिंजवडी परिसरातील प्रस्तावित नव्या रस्त्यांसाठी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून कार्यवाही सुरु करण्यात आली असून, या रस्त्यासाठी आवश्यक जागेसाठी भूसंपादन प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. भूसंपादनानंतर पीएमआरडीएकडून या रस्त्याच्या उभारणीसाठी निविदा काढण्यात येणार आहे.

हिंजवडी आयटी पार्कमधील नागरी समस्या, वाहतूक कोंडी आणि एकूणच आयटी पार्क परिसर सुधारण्यासाठी पीएमआरडीए समवेत सर्वच शासकीय यंत्रणांनी या ठिकाणी लक्ष घातले होते. दरम्यान, या ठिकाणांची कोंडी फोडण्यासाठी येथे पाच रस्त्यांची



आखणी पीएमआरडीएच्या वतीने करण्यात आली होती. त्यानुसार, प्रामुख्याने तीन रस्त्यांवर जवळपास दीड हजारांहून अधिक अतिक्रमणे काढण्यात आली होती. त्यानुसार, त्या ठिकाणी रस्ते निर्मिती करण्यात येणार आहे.

हिंजवडी आयटी पार्कला जोडणासाठी लक्ष्मी चौक, छत्रपती शिवाजी चौक, मारुंजी, पांडवनगर या ठिकाणाहून रस्ते जोडण्यात येणार आहे. एकूण दहा रस्ते असून, ते 20 किलोमीटरचे असणार आहेत. त्यातील पांडवनगर ते माणगाव आणि तेथून मेझा 9 हा सर्वाधिक 4.85 किलोमीटरचा असणार आहे. तर, इतर रस्ते हे 1 ते 3 किलोमीटर असणार आहे.

दरम्यान, या रस्त्यांवर अतिक्रमणे काढल्यानंतर भूसंपादन प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. त्यानंतर या रस्त्यासाठी निविदा काढण्यात येईल. दरम्यान, यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठपुरावा करावा लागणार आहे. तसेच, सध्या अस्तित्वात असलेल्या रस्त्याची डागडुजी आणि दुरुस्तीदेखील करावी लागणार आहे.

> हिंजवडी परिसरातील रस्त्याबाबत नुकतीच बैठक झाली असून, पाच मुख्य रस्त्यांच्या भूसंपादनाचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविण्यात आले होते.
>
> **- शिवप्रसाद बागडी, अधीक्षक अभियंता, पीएमआरडीए.**

### आयटी पार्कमधील रस्त्यांची दुरवस्था

» हिंजवडी येथील आयटी पार्कमधील रस्त्यांची दुरवस्था झाली आहे. ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत. यापूर्वी तात्पुरती डागडुजी करण्यात आली होती; मात्र जोरदार पावसामुळे यातील मुरुम, माती निघून गेल्याने पुन्हा जैसे थे परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे आयटीन्सकडून संताप व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान, एमआयडीसीकडून पांडवनगर परिसरातील काही खड्डे बुजविण्याचे काम हाती घेतले आहे.


# अतिक्रमण करणाऱ्यांना आता सुट्टी नाहीच!

## महापालिकेच्या 15 क्षेत्रीय कार्यालयासह मुख्य विभागाच्या वतीने अतिक्रमणांवर कारवाई

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील विविध रस्त्यांवर होणाऱ्या बेकायदा अतिक्रमणांमुळे अनेक भागात वाहतूक कोंडी निर्माण होते. पदपथांवर अनधिकृतपणे पथारी व्यावसायिक बसतात. दुकानदारांनी तसेच हॉटेल चालकांनी दुकानाच्या समोरील आणि आजूबाजूच्या मोकळ्या जागेत (फ्रंट व साइड मार्जिनमध्ये) बांधकाम केल्याचे समोर आले आहे.

या बेकायदा पद्धतीने करण्यात आलेल्या अतिक्रमणांवर तसेच बांधकामांवर कडक कारवाई करण्याचे आदेश महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी दिले आहेत. या आदेशाची कठोर अंमलबजावणी करण्याचा निर्णय अधिक्रमण तसेच बांधकाम विभागाने घेतला आहे. महापालिकेच्या १५ क्षेत्रीय कार्यालयासह मुख्य विभागाच्या वतीने अतिक्रमणांवर कारवाई सुरू करण्यात आली आहे.




वारजे-कर्वेनगर क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत असलेले फुटपाथ, रस्त्यावर, तसेच दुकानासमोरील आणि आजूबाजूच्या जागेत झालेल्या बांधकामावर कारवाई करण्यात आली. या कारवाईमध्ये तब्बल १३ हजार ४७५ चौरस फूट कच्चे-पक्के बांधकाम पाडण्यात आले. डीपी रस्ता, आंबेडकर चौक ते वारजे हायवे पूल, समर्थ पथ, गुलाबराव ताठे पथ येथे ही कारवाई झाली.

बांधकाम विकास विभाग, अतिक्रमण निर्मूलन विभाग यांनी संयुक्तपणे ही कारवाई केली. कारवाई दरम्यान महाराष्ट्र सुरक्षा दलाचे पाच जवान, तीन पोलिस कर्मचारी, अतिक्रमण विभागाचे अधिकारी-कर्मचारी, आठ साहाय्यक निरीक्षक, बिगारी सेवक तसेच चार ट्रक आणि एक पिंजरा वाहन अशी यंत्रणा तैनात करण्यात आली होती. या मोहिमेत पाच हातगाड्या, आठ काउंटर, नऊ फ्रिज, १० पथारी, २७ शेड आणि इतर २१ साहित्य जप्त केले.

क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत झालेल्या अतिक्रमणांनी परिसराला विविध समस्यांनी ग्रासले होते. त्याचा नाहक त्रास सर्वसामान्यांना सहन करावा लागत होता. या अतिक्रमणाबाबत प्रशासनाकडे अनेक तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्याची दखल घेत महापालिकेचा अतिक्रमण आणि बांधकाम विभागाने ही कारवाई केल्याची माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली.

कनिष्ठ अभियंता सागर शिंदे, अतिक्रमण निरीक्षक संजय जाधव, अविनाश धरपाळे, वैभव जाधव, प्रदीप महाले, ज्ञानेश्वर बावधने, दिनेश नवाळे, किरण पाटील, आविष्कार दवणे, आकांक्षा खोडे व प्रथमेश पाटील यांनी ही कारवाई केली. अतिक्रमण विभागाचे उपआयुक्त संदीप खलाटे, परिमंडळ ३ चे अपर आयुक्त अमित काटकर यांच्या मार्गदर्शनाखाली, तर वारजे-कर्वेनगर विभागाचे साहायक आयुक्त सोमनाथ आढाव यांच्या नियंत्रणाखाली पार पडली.

बिबवेवाडी क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत झालेल्या अतिक्रमणांवर कारवाई करण्यात आली. यावेळी १७ हजार ३०० चौरस फूट क्षेत्र मोकळे करण्यात आले. पत्रा शेड, गाळे, टपऱ्या यासह हॉटेल आणि दुकानांमध्ये फ्रंट आणि साईड मार्जिन यावर कारवाई करण्यात आली. एक जेसीबी, गॅस कटर, ६७ अतिक्रमण विभागाचे कर्मचारी यात सहभागी झाले होते.

# जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत नोकरभरती; एक हजार 60 पदांसाठी भरती प्रक्रिया

## लेखनिक, शिपाई, वाहनचालक अशा पदांसाठी ही प्रक्रिया राबविली जाणार; अजित पवार यांची माहिती

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत येत्या काळात १ हजार ८० पदे भरली जाणार आहेत. लेखनिक, शिपाई, वाहनचालक अशा पदांसाठी ही प्रक्रिया राबविली जाणार असल्याची माहिती राज्याचे उपमुख्यमंत्री, पालकमंत्री अजित पवार यांनी येथे दिली. 'बँकेसाठी भरती प्रक्रिया राबविताना जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या मुलांनाच प्राधान्य दिले जाईल. त्यासाठी शक्य ती मदत केली जाईल,' असे सांगताना भरती प्रक्रियेत काही गडबड झाल्याचे कानावर आले तर, माफ करणार नाही, असा सूचक इशाराही त्यांनी पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाला दिला.

दरम्यान, 'सगळ्या गोष्टी नियमाबवर बोट ठेवून करू नका. शेवटी माणसे, बळीराजा जगला पाहिजे,'अशी सूचनाही त्यांनी जिल्हा बँकेच्या अधिकाऱ्यांना केली.




पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची १०८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शुक्रवारी अल्पबचत भवन येथे झाली. त्या सभेत पवार यांनी ही माहिती दिली. राज्याचे कृषिमंत्री आणि बँकेचे संचालक दत्तात्रय भरणे, जिल्हा बँकेचे अध्यक्ष दिगंबर दुर्गाडे, उपाध्यक्ष सुनील चांदेरे, माजी मंत्री आमदार दिलीप वळसे-पाटील दिलीप मोहिते आणि अशोक पवार यांच्यासह सर्व संचालक मंडळ आणि मुख्य कार्यकारी अधिकारी अनिरुद्ध देसाई उपस्थित होते. गेल्या आर्थिक वर्षात बँकेने केलेली कामगिरी आणि संचालक मंडळाच्या कारभाराचे कौतुकही पवार यांनी केले.

'बँकेत विविध पदांच्या १ हजार ८० जागांची भरती होणार आहे. त्यामध्ये पहिल्या टप्प्यात तीनशेहून अधिक जागांची भरती झाली आहे. येत्या काही दिवसांमध्ये पावणेचारशे जागांची भरती होईल. मात्र, या भरतीसाठी सहकार खाते, नाबार्ड आणि रिझर्व्ह बँकेने ठरवून दिलेल्या निकषानुसार भरती प्रक्रिया राबविण्या येणार असून जिल्ह्यातील सभासद असलेल्या शेतकऱ्यांच्या मुलांना न्याय दिला जाईल,' असे पवार यांनी स्पष्ट केले.

भरती प्रक्रिया राबविताना कोणतीही गडबड करू नये, अशी सूचनाही पवार यांनी देताना एका जिल्हा बँकेच्या भरती प्रक्रियेतील गैरप्रकाराचे उदाहरण दिले. तेथे भरतीचा दर पंचवीस लाख रुपये ठरल्याच्या तक्रारी आल्या होत्या. असे प्रकार केले तर सर्वसमान्य घरातील नागरिक भरडले जातात. त्यामुळे असे प्रकार कोणत्याही परिस्थितीमध्ये सहन केले जाणार नाहीत. भरतीमध्ये काही गडबड केल्याचे कानावर आले, तर खपून घेणार नाही, कोणाला ही माफ करणार नाही, अशा इशारीही पवार यांनी दिला.

दरम्यान, दिवाळी बोनस म्हणून केडर सचिवांची २५ हजार रुपयांची मागणी उपमुख्यमंत्री पवार यांनी मान्य केली. तसा ठराव संचालक मंडळाच्या बैठकीत करण्याच्या सूचना त्यांनी संचालक मंडळाला केली.

ते म्हणाले,' तीन लाख रुपयांपर्यंत शून्य टक्के व्याजदराने कर्ज घेणार्यांची संख्या जवळपास २ लाख ८८ हजार आहे. त्याच्या व्याजापोटीचा हिस्सा केंद्र, राज्य आणि काही हिस्सा बँक उचलते. त्यासाठी नऊ कोटी रुपयांचा बोजा बँकेवर येतो. ही रक्कम पाच लाख रुपये केल्यास अवघ्या २ हजार ४०० सभासदांना लाभ होईल. मात्र, त्यापोटी नऊ कोटी रुपयांनी बँकेवर आणखी बोजा वाढले. त्यामुळे हे करणे शक्य नाही.

### बँकेच्या कारभारावर बारीक लक्ष

» बँकेत संचालक नसलो तरी जिल्हा बँकेच्या कारभाराकडे बारकाईने लक्ष घालत आहे. बँकेत काहीही चुकीचे काही होऊ देणार नाही. जो पर्यंत मी धडधाकड आहे. तो पर्यंत बँकेवर लक्ष राहिल. तसेच चांगल्या कामांसाठी पाठीशी उभा राहीन, असे आश्वासन अजित पवार यांनी दिले. 'मी बँकेत आलो तेंव्हा रमेश थोरात कारभार पहायचे. उगीच जागा अडवून ठेवायची नव्हती म्हणून मी बँकेच्या संचालक पदाचा राजीनामा दिला, असे पवार यांनी स्पष्ट केले.

# पूरग्रस्तांना आवश्यक ती मदत करणार

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांची ग्वाही; सोमेश्वरच्या डिस्टिलरी विस्तारवाढ प्रकल्पाचे भूमिपूजन



**पुणे | प्रतिनिधी**

मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री व मंत्रिमंडळ केंद्र सरकारकडून राज्यातील पूरग्रस्तांसाठी जास्तीत जास्त निधी आणण्यासाठी प्रयत्नशील आहे. पूरग्रस्तांसाठी जे-जे करणे शक्य आहे ते आम्ही करू, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सोमेश्वर येथे दिली.

सोमेश्वर कारखान्याच्या डिस्टिलरी विस्तारवाढ प्रकल्पाचे भूमिपूजन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते शुक्रवारी (दि. 26) रोजी झाले, त्यावेळी ते बोलत होते. या वेळी सोमेश्वर कारखान्याचे अध्यक्ष पुरुषोत्तम जगताप, उपाध्यक्ष मिलिंद कांबळे, जिल्हा बँकेचे अध्यक्ष दिगंबर दुर्गाडे, सोमेश्वरचे माजी अध्यक्ष शहाजी काकडे, माजी सभापती प्रमोद काकडे, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष राजवर्धन शिंदे, जिल्हा बँकेचे संचालक संभाजी होळकर, कार्यकारी संचालक राजेंद्र यादव, सर्व संचालक यांच्यासह शेतकरी-सभासद उपस्थित होते.

अजित पवार म्हणाले, राज्यावर पुराचे आस्मानी संकट आहे. शेतीसह जनावरांचे मोठे नुकसान झाले आहे. सरकारने 2200 कोटी रुपये मंजूर केले असून, शेतकऱ्यांना तातडीची मदत दिली जात आहे.

निरा डाव्या कालव्याचे अस्तरीकरण सध्या सुरू आहे, मात्र पूर्ण कालव्याला अस्तरीकरण होणार नसून ज्या ठिकाणी भराव खचले आहेत, कालवा फुटण्याचा धोका आहे त्याच ठिकाणी अस्तरीकरण होणार आहे, त्यामुळे शेतकऱ्यांनी काळजी करू नये. शेतीत एआय तंत्रज्ञानाचा वापर वाढवावा असे आवाहन पवार यांनी शेतकऱ्यांना केले.

सोमेश्वर कारखान्याचे अध्यक्ष पुरुषोत्तम जगताप यांनी प्रास्ताविकात कारखान्याच्या प्रगतीचा आढावा घेतला. उपाध्यक्ष मिलिंद कांबळे यांनी आभार मानले.

**सोमेश्वरकडेही येणार आहे**

आम्हाला खाज होती म्हणून माळेगाव कारखान्याचा चेअरमन झालो..! आता तिथे सभासददेखील झालो आहे. पण, थोडे थांबा मी सोमेश्वर कारखान्याकडे पण येणार आहे असे म्हणताच उपस्थित शेकडो सभासदांच्या भुवया उंचावल्या..! मात्र थोड्याच वेळात मी गंमत केली असे म्हणत उपमुख्यमंत्री अजित पवारांनी सभासदांच्या टाळ्या घेतल्या. मात्र, एकंदरीत उपमुख्यमंत्र्यांनी सोमेश्वर कारखान्याचे चेअरमन व्हावे का..? या प्रश्नावरती पुन्हा एकदा चर्चेला सुरुवात झाली आहे.

### जि. प. निवडणुकीत नव्यांना संधी

» येणाऱ्या जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीत नवीन आणि तरुण चेहऱ्यांना संधी देण्याचे सूतोवाच उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सोमेश्वरच्या सभेत केल्याने येणाऱ्या निवडणुकीत इच्छुक तरुणांची संख्या वाढणार आहे.

### पूरग्रस्तांसाठी 15 लाखांची मदत

» सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या कामगारांनी आणि संचालक मंडळांनी पूरग्रस्तांसाठी 15 लाख रुपयांची भरीव मदत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे सुपूर्द केली. पूरग्रस्तांसाठी सर्वांनी मदत करण्याचे आव्हान उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले आहे. उद्योजक आर. एन. शिंदे यांनी दोन लाख, पंकज निलाखे यांनी 51 हजार आणि सैनिक संघटनेचे अध्यक्ष ताराचंद शेंडकर यांनी 11 हजार रुपयांची आर्थिक मदत उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत केली.

# पुरंदर विमानतळासाठी पहिल्या दिवशी 50 हेक्टर जमिनीची मोजणी शांततेत

## जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्यानुसार मोजणीसाठी पाच पथके तयार; पुढील 25 दिवस काम सुरु राहणार



**पुणे | प्रतिनिधी**

प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी पुरंदर तालुक्यात भूसंपादन होत असून, आतापर्यंत 95 टक्के शेतकऱ्यांनी जिल्हा प्रशासनाला संमती दिली आहे. शुक्रवारपासून (दि. 26) प्रत्यक्ष जमीन मोजणीला सुरुवात झाली आहे. पहिल्या दिवशी 50 हेक्टर जमिनीची मोजणी शांततेत पार पडल्याची माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली.

पुरंदर तालुक्यातील कुंभारवळण, एखतपूर, पारगाव, मुंजवडी, खानवडी, उदाची वाडी आणि वनपुरी या सात गावांच्या जागेवर विमानतळ उभारण्यात येणार आहे. यासाठी तीन हजार एकर जमीन संपादित केली जाणार आहे. शेतकऱ्यांना संमती देण्यासाठी 25 सप्टेंबरपर्यंत मुदत देण्यात आली होती. 3 हजार 220 जणांनी 2 हजार 810 एकर जमिनीला संमती दिली होती. शुक्रवारी जमीन मोजणीसाठी पाच पथके तयार करण्यात आली होती.

महसूल विभाग, वन विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, कृषी विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पुरंदर उपसा सिंचन आणि इतर शासकीय विभागातील अधिकारी-कर्मचारी या वेळी उपस्थित होते. खानवडी, मुंजवडी, एखतपूर येथील 50 हेक्टर जमिनीची मोजणी करण्यात आली. तसेच फळझाडे, शेतविहीर, पाईपलाईन आदींचे मूल्यांकन करण्यात येत आहे. पुढील 25 दिवस जमीन मोजणीचे काम सुरू राहणार आहे. स्थानिक शेतकरी तसेच बाहेरगावी राहणाऱ्या शेतकऱ्यांनी मोजणीच्या वेळी उपस्थित राहावे. त्यांच्या जमिनीत असणाऱ्या फळझाडांसह मालमत्तेची माहिती द्यावी, जेणेकरून अचूकता आणि पारदर्शकता राहील, असे जिल्हा प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले आहे.

### तिन्ही गावांतील मोजणी शांततेत

» यापूर्वी जमिनीच्या सर्वेक्षणाला स्थानिकांनी मोठ्या प्रमाणात विरोध केला होता. त्या वेळी पोलिसांना लाठीचार्ज करावा लागला होता. त्यामुळे शुक्रवारपासून सुरू होणाऱ्या जमिनीच्या मोजणीकडे सर्वांचे लक्ष लागले होते. शुक्रवारी तिन्ही गावांतील मोजणी अत्यंत शांततेत पार पडल्याचे प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले आहे.

“ प्रस्तावित पुरंदर विमानतळासाठी संपादित करण्यात येणाऱ्या जमिनीच्या मोजणीला शुक्रवारी सुरुवात झाली आहे. जमिनीच्या मोजणीसाठी 5 पथकांची नियुक्ती करण्यात आली असून, यासाठी पुढील 25 दिवसांची गरज लागणार आहे. पुढील काळात मोजणीसाठी ड्रोनचा वापर करण्यात येणार आहे.

**- जितेंद्र डुडी, जिल्हाधिकारी.**